# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मुंबईतील कांदिवली (प.) परिसरातील स्वच्छता गृहात गुदमरुन कर्मचारी बेशुद्ध पडल्याबाबत

**(१) ४६८३३ (३०-१०-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (प.) परिसरातील एका स्वच्छता गृहात गुदमरुन ३ कर्मचारी बेशुध्द पडले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेीआहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी अशाच प्रकारे कांदिवली (प.) येथील चारकोप परिसरात बांधण्यात आलेल्या सेप्टिक टँकमध्ये गुदमरुन ३ खाजगी कामगारांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तिघांना कोणत्याही प्रकारची सुरक्षा उपाययोजना न करता कंत्राटदाराने टाकीत उतरवून त्यांचा जीव धोक्यात घातल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती सदर घटनेला जबाबदार असणाऱ्या आर/दक्षिण विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच राज्यातील सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षेची साधने पुरविण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) दिनांक १३.०४.२०२२ रोजी सदर शौचालयाच्या पाण्याच्या टाकीचे साफसफाईचे काम मे. एन. सी. एन्टरप्रायजेस यांचेमार्फत सुरु असतांना, तीन खाजगी कामगारांपैकी एक कामगार बेशुध्द झाला होता व २ कामगारांना अस्वस्थ वाटत असल्याने त्यांना तात्काळ नजीकच्या रुग्णालयात दाखल केले असता त्यांची तपासणी करुन, त्यांची तब्बेत सुस्थितीत झाल्यावर त्यांना रुग्णालयातून घरी पाठविण्यात आले.

(२) हे खरे आहे.

(३) सदर शौचालयाचे प्रचालन व परिरक्षण व्यवस्थापन करण्यासाठी वस्ती पातळीवरील मे.न्यू एकता वेल्फेअर सोसायटी, सी.बी.ओ. (कम्युनिटी बेस ऑर्गनायझेशन) म्हणून देखरेख करीत होते.

केंद्र शासनाने हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम २०१३ पारित केला आहे.

सदर कामाकरिता सफाई कामगारांच्या नियुक्तीस कायद्यानुसार प्रतिबंध आहे. सीबीओ संस्थांना साफसफाईबाबतच्या सूचना व एन.जी.ओ. मार्फत आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले असून देखील सदर संस्थेमार्फत गल्ली नं. ९ येथील शौचालयाच्या (मॅन्युअल स्कॅव्हेजिंग) सेफ्टीक टाकीची साफसफाई करण्याकरिता मनुष्यबळ वापरण्यात आले होते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- कांदिवली पोलीस ठाणे येथे प्रकरण क्रमांक २८८/२०२२ कलम ३०४, ३४ भादंवि तसेच हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा योजनेस प्रतिबंध आणि त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ अन्वये संबंधित संस्था चालक, शौचालय चालक व मुकादम यांचे विरोधात दिनांक १०.०३.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

- मे. न्यू एकता वेल्फेअर सोसायटी यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.
- महानगरपालिकेच्या धोरणानुसार आर/दक्षिण विभागातील सर्व सार्वजनिक शौचालयातील नियुक्ती सी.बी.ओ. संस्थांना सेफ्टीक टाकीची साफसफाई करण्यासाठी कोणतेही मनुष्यबळ न वापरण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. तसेच सी.बी.ओ. संस्थांना साफसफाईबाबतच्या सूचना व एन.जी.ओ. मार्फत आवश्यक प्रशिक्षण पुन्हा नव्याने देण्यात आले आहे.
- दिनांक १२.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मयत व्यक्तींच्या वारसांना नुकसान भरपाई अदा करण्याबात संबंधित संस्थेस कळविण्यात आले आहे.
- एकता नगर, गल्ली नं. ९ येथील शौचालय चालविण्याकरिता नवीन संस्था "हाजी रफीउद्दीन चौधरी एकता मित्र मंडळ" यांची सी.बी.ओ. म्हणून निवड करण्यात आली असून, सी.बी.ओ. आणि महानगरपालिका यांचेमधील सामंजस्य करार झालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) येथील मैदानाचे भूखंड संपादन प्रलंबित असल्याबाबत**

**(२) ४६८६८ (१०-११-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) येथील मैदानाचा भूखंड संपादन करण्यात यावा असा निर्णय महानगरपालिकेच्या सुधार समितीने तसेच सर्वसाधारण सभेने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनंतर याबाबत विकासकाने भूखंड संपादन न करता त्यास विकासासाठी परवानगी मिळावी असा विनंती अर्ज केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणताही कायदेशीर आधार नसतानाही संपादनाची कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासकाला मदत करण्यासाठी सदर भूखंड संपादन न करणेबाबत महानगरपालिकेवर दबाव आणण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, संपादन कार्यवाही अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

सदर भूखंडाच्या भूसंपादनाची प्रक्रिया विशेष भूसंपादन अधिकारी-४ यांचेमार्फत करण्यात आल्यानंतर दिनांक २४.११.२०२० रोजीच्या पत्रानुसार भूसंपादनाची रु.२.५७ कोटी इतकी ३०% रक्कम भरण्याबाबत कळविले आहे. तसेच, नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांचेमार्फत दिनांक ०८.०१.२०२० रोजी सदर भूखंडाची संयुक्त मोजणी करण्यात आली.

तथापि, सदर भूखंडाचे क्षेत्र १००० चौ.मी. पेक्षा कमी असल्यामुळे सदर भूखंडाचे मालक/विकासक याचा समायोजन आरक्षणाचा प्रस्ताव तत्कालीन आयुक्तांच्या दिनांक २९.११.२०१९ च्या मंजुरीनुसार नाकारण्यात आला होता. सदर प्रस्ताव नाकारल्यामुळे भूखंड मालकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक २५५/२०२० मध्ये मा.न्यायालयाने, न.भू.क्र. ५२९ (पै), मौजे विलेपार्ले येथील शहाजी राजे मार्गावरील "खेळाचे मैदान" या सार्वजनिक उद्दिष्टाकरिता आरक्षित असलेला भूखंड समायोजन आरक्षणांतर्गत विकास परवानगी देण्याबाबत फेरविचार करावा, असे आदेशित केले.

त्याअनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने, सदर भूखंडाचे भूसंपादन वगळण्याकरिता सुधार समिती व महापालिकेने मंजुरी दिल्यास, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील क्रमांक १७ च्या तरतुदीनुसार जमीन मालक/विकासकाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येईल अथवा भूखंड संपादनाच्या प्रक्रियेवर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आदेश पारित केले.

तद्नंतर जमीन मालक/विकासक यांना दिनांक ११.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सुधार समितीने उपस्थित केलेल्या चर्चेतील मुद्द्यांवर त्यांचे स्पष्टीकरण मागविण्यात आले असून, जमीन मालक/विकासक यांचेकडून सुधारीत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## बुलढाणा जिल्ह्यात ध्वनी प्रदूषण मोजणारे यंत्र उपलब्ध करुन ध्वनी प्रदूषण नियंत्रण मंडळ स्थापन करण्याबाबत

**(३) ४६९८८ (१७-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरात ध्वनी प्रदूषण मोजणारे यंत्र तसेच ध्वनी प्रदूषण नियंत्रण मंडळ नसल्याची बाब माहे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बुलढाणा जिल्ह्यात ध्वनी प्रदूषण मोजणारे यंत्र उपलब्ध करणे तसेच ध्वनी प्रदूषण नियंत्रण मंडळ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अकोला यांच्याकडे ध्वनी प्रदूषण मोजणारे यंत्र उपलब्ध आहे. तथापि, बुलढाणा शहरात तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये ध्वनी प्रदूषण नियंत्रण मंडळ असे स्वतंत्र मंडळ अस्तित्वात नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकती परस्पर भाडेतत्वावर दिल्याबाबत

**(४) ४७०४१ (१०-११-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील कोंढवा, औंध येथील मिळकती नगरसेवक बेकायदा वापरत असून, मिळकती भाडेतत्वावर देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेत किती मिळकती असून, त्यातील किती मिळकतींचा गैरवापर सुरु आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२३) :** (१) पुणे महानगरपालिका हद्दीतील कोंढवा स. नं. ४५ येथील बहुउद्देशीय हॉल व औंध स.नं.१५३ येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्राचा पुणे महानगरपालिकेची परवानगी न घेता वापर चालू असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या ३९९२ मिळकती असुन त्यांची संबंधित विभागांनी तपासणी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) कोंढवा - प्रभाग क्र. २७ साईबाबनगर कोंढवा खु. स.नं. ४६ पार्ट येथील अनधिकृत वापराबाबत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औंध- पुणे पेठ औंध स.नं.१५३ येथील इंदिरागांधी शाळेच्या आवारातील महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्राचा अनधिकृत वापर चालू असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित व्यक्तीवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना भोगवटादार वर्ग-२ पर्यायी जमीनीचे वाटप करण्याबाबत

**(५) ४७०६८ (२०-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना भोगवटादार वर्ग-२ पर्यायी जमीनीचे वाटप केलेले दिनांकापासून १० वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर जमीनीचे रुपांतरण भोगवटादार वर्ग-१ मध्ये करण्याबाबत पुणेसह राज्यातील प्रकल्पग्रस्तांचे आग्रही मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर धोरणात्मक निर्णय घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार पात्र प्रकल्पबाधित व्यक्तींना भोगवटादार वर्ग-२ पर्यायी जमिनीचे वाटप केल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर सदर जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ४ जुन, २०१९ निर्गमित करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाबाबत

**(६) ४७१३९ (२५-०९-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार पुणे महानगरपालिकेमार्फत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सर्वेक्षणाचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) योजना २०१७ या योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाकडून सूचना देण्यात आल्या होत्या. सदर सूचनांनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पथविक्रेता समिती स्थापन करणे, फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, मतदार यादी तयार करणे, मतदार यादी प्रसिद्ध करुन निवडणूक घेणे व त्यानंतर पथविक्रेता समिती गठीत करणे इत्यादीबाबतची कार्यवाही करुन याबाबतची माहिती शासनास देणे आवश्यक होते.

उपरोक्तप्रमाणे ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून कार्यवाही केली गेली नसल्यास त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदरची कार्यवाही तातडीने करण्याकरिता दि.१२/०४/२०२२ च्या पत्रामध्ये नमूद केलेल्या कालावधीप्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन घेण्याबाबत सर्व नगरपालिका/महानगरपालिकेस कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने पुणे महानगरपालिका स्तरावर सदर शासनाच्या पत्रानुसार कार्यवाही चालू करण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावरील धायरी येथील जलतरण तलाव चालविण्यासाठी तलाव ताब्यात घेऊन प्रवेश प्रक्रिया सुरू केल्याबाबत

**(७) ४७१६१ (१०-११-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावरील धायरी येथील पुणे महापालिकेतील स्वर्गीय रमेशभाऊ वांजळे जलतरण तलाव चालविण्यासाठी निविदा प्रक्रिया झाली नसताना एका ठेकेदाराने तलाव ताब्यात घेऊन प्रवेश प्रक्रिया सुरू केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी असलेल्या ठेकेदाराचा कालावधी संपला असून, त्यांनी आधीची थकबाकी देखील भरली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच विविध कारणांमुळे जलतरण तलाव गेल्या काही दिवसांपासून बंद अवस्थेत असूनही सदरहू ठेकेदार नागरिकांकडून पैसे घेत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेकेदाराविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर मिळकत सील केली असल्याने सदरहू बाब खरी नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेनगाव तालुक्यात (जि.हिगोली) अपघाताचे प्रमाण वाढल्याबाबत

**(८) ४७३७८ (२०-०९-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (जि .हिंगोली) तालुक्यात तरुणांमधील वाढत्या व्यसनाधिनतेमुळे मागील महिन्यात दुचाकी, चारचाकी वाहन अपघातामध्ये १० तरुण मृत्यूमुखी पडल्याचे माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार हिंगोली जिल्ह्यात वाढती व्यसनाधिनता कमी करण्याच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाने तात्काळ जन जागृती कार्यक्रम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

---

## राष्ट्रीय महामार्ग ५४८ (सी) खामगाव ते पंढरपुर (भाग- माजलगाव ते केज) रस्त्याच्या कामाबाबत

**(९) ४७६४३ (२२-०९-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग ५४८ (सी) खामगाव ते पंढरपुर (भाग-माजलगाव ते केज) या रस्त्याचे काम पुर्ण होवुन कंत्राटदारास दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी कामाचा पुर्ण मोबदला देण्यात आला आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदारांनी निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे सद्यस्थितीत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा व खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावर कंत्राटदाराने दोषदायित्व कालावधीमध्ये किती पॅनेल्स बदलावयाचे होते व किती पॅनेल्स बदलले आहेत ,

(४) असल्यास, सदर कंत्राटदाराचा दोषदायित्व कालावधी दिनांक २३ ऑक्टोबर, २०२२ रोजी संपत असुन त्या पुर्वीचे पॅनेल्स व इतर सुधारणा करण्याचे काम पुर्ण करणार आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने कंत्राटदारावर व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) नाही.

कंत्राटदारास अद्याप कामाचा पूर्ण मोबदला देण्यात आलेला नाही. दिनांक १६.०१.२०२० ही प्रकल्प पुर्णत्व (COD) ची तारीख आहे. भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण होताच उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारासोबत पुरवणी करारनामा (Supplementary Agreement) केलेला आहे. काम पुर्ण न झाल्यामुळे कंत्राटदारास अंतिम देयक अद्यापपर्यंत देण्यात आलेले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत रस्त्यावर खड्डे पडलेले नसून काही ठिकाणी भेगा दिसून येत आहेत व त्याची दुरुस्ती कंत्राटदाराने बऱ्याच ठिकाणी केलेली असून काही ठिकाणी दुरुस्ती प्रगतीत आहे.

(३) दोषदायित्व कालावधीमध्ये जितके पॅनल्स खराब होतील त्याचे अवलोकन करुन पुर्णत: खराब झालेले पॅनल्स कंत्राटदाराने बदलावयाचे असतात. या रस्त्यावर एकुण ३७३३५ पॅनेल्स असून त्यापैकी आतापर्यंत ७६१ पॅनेल्स खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी ४३४ पॅनेल्स IRC मानकाप्रमाणे आतापर्यंत बदलविण्यात आलेले आहेत व उर्वीरित पॅनल्स बदलण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) कंत्राटदाराचा दोषदायित्व कालावधी दिनांक २३.१०.२०२२ रोजी संपलेला असून त्यापूर्वीच खराब झालेले सर्व पॅनेल्स बदलायचे होते मात्र कंत्राटदार ते पुर्ण करुन शकलेला नाही. कंत्राटदाराचा दोषदायित्व कालावधी वाढविण्याची तरतूद EPC कंत्राटात आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून EPC कंत्राटातील कलम १७.६ नुसार कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) कंत्राटदाराने खराब पॅनेल्स बदलविण्यात उशीर केल्यामुळे कंत्राटदाराच्या देय देयकातून रुपये २५० लक्ष इतकी रक्कम वसूल करुन मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांनी दिनांक ११.१०.२०२२ च्या पत्रान्वये प्रस्ताव केंद्रिय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांच्याकडे देयक पाठविण्यात आलेले आहे. देयक देण्याचा अंतिम निर्णय केंद्रिय रस्ते वाहतुक व मंत्रालय यांचा असतो व त्यांनी तो राखून ठेवलेला आहे.

---

## मुंबईतील सायन रुग्णालयात सुविधांचा विस्तार करण्याबाबत

**(१०) ४७८३१ (३०-१०-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन रुग्णालयातील बाहयरुग्णसेवा विभागात दररोज किमान साडेपाच हजार रुग्ण विविध आजारांवरील तपासणीसाठी येत असल्याचे दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात खाटांची संख्या सुमारे १ हजार ७२० आहे. परंतु येथे दररोज सरासरी दोन ते सव्वादोन हजार रुग्ण उपचार घेत असून सध्याची यंत्रणा अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने माहिती घेऊन निधीची तरतूद करुन या रुग्णालयाची क्षमता वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सायन रुग्णालयात खाटांची संख्या सुमारे १ हजार ९०० इतकी आहे. बहुतांश कक्षामध्ये क्षमतेपेक्षा जास्त आंतररुग्ण दाखल करुन घ्यावे लागतात. त्यामुळे सद्य:स्थितीत उपलब्ध यंत्रणेवर ताण येतो, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सायन रुग्णालयाच्या पुनर्विकासाचे काम टप्प्याटप्प्याने करण्यात येत असून, पहिल्या टप्प्याचे काम सुरु झाले आहे. त्यानुसार नवीन इमारतीमध्ये रुग्णालयाच्या खाटांची संख्या १९०० वरुन २८०० करण्याचे प्रस्तावित आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) येथील मागासवर्गीय मुलांची निवासी शाळा खाजगी जागेत सुरु करण्याबाबत

**(११) ४७८७९ (०६-१०-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथे मागासवर्गीय मुलांच्या निवासी शाळेला माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे असूनही उक्त निवासी शाळा जागेअभावी सुरु करण्यात आली नसून, निवासी शाळेस जागा उपलब्ध करून दिल्यास सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात सुरु करण्याचे आश्वासन सामाजिक न्याय मंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवासी शाळा खाजगी जागेमध्ये सुरु करण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी चा बीसीएस -२०१७/प्र.क्र.२३८/शिक्षण–२ मंत्रालय, दिनांक २६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) मा.आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना सदर ठिकाणी शासकीय जागेच्या उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल प्राप्त करून शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून देखील अद्याप अहवाल सादर करण्यात आलेला नाही हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवाल सादर करून शाळा सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१), (२) व (३) होय.
(४) दौंड, जि.पुणे या ठिकाणी निवासी शाळेसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ च्या अर्धशासकीय पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना पुन्हा विनंती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील अतिधोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याबाबत

**(१२) ४७९७४ (२८-०९-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात सुमारे ३०० इमारती अतिधोकादायक (सी-१) श्रेणीतील असून या सर्व इमारतीमधील रहिवाश्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतराकरिता दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी नोटीस बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केलेल्या संर्वेक्षणात ३३७ धोकादायक इमारतींपैकी किती इमारती मुंबई शहर व पूर्व आणि पश्चिम उपनगरातील आहेत,
(३) असल्यास, सदरहू धोकादायक इमारती कोसळून होणारी जिवीतहानी टाळण्यासाठी शासन तथा पालिका प्रशासनाने बाधित रहिवाशी कुटुंबांना त्याच परिसरात पर्यायी गाळे देऊन सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेल्या सर्वेक्षणात सी-१ प्रवर्गातील एकूण ३८१ इमारती अतिधोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.
मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असलेल्या इमारती वगळून इतर सर्व इमारतींमध्ये राहणाऱ्या सर्व रहिवाशांना दिनांक २५.०५.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये नोटीस बजावून त्यांच्या राहत्या सदनिका / दुकाने रिकामी करुन पर्यायी व्यवस्था करण्यासाठी कळविण्यात आले आहे. तसेच सदर इमारतींची जलजोडणी व वीजजोडणी खंडीत करण्यात आली असून, त्यापैकी बऱ्याच इमारती स्थानिक पोलीसांच्या मदतीने रिकाम्या करण्यात आल्या आहेत.
(२) सदर सर्वेक्षणात मुंबई शहरात ८३, पूर्व उपनगरात १२९, पश्चिम उपनगरात १५९ व नगरबाह्य विभागात १० इमारती अतिधोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.
(३) सदर प्रकरणी शासन व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके व धोरणानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्नाटक बेळगाव सिमाभागातून प्रकाशित होणाऱ्या व महाराष्ट्र शासनाच्या मान्यता यादीवर असणाऱ्या मराठी वृत्तपत्रांना अतिरिक्त दर्शनी जाहिरात देण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत

**(१३) ४८०१२ (३१-१०-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्नाटक सिमाभागातील बेळगाव येथून मोजकी वृत्तपत्रे सुमारे १०० ते १५० वर्षापासुन नियमितपणे प्रकाशित होत असून महाराष्ट्र शासनाच्या मान्यता यादीवर सिमाभागातील ५ दैनिके व ५ साप्ताहिके गेल्या ५० वर्षापासून कार्यरत असल्याची बाब माहे मे, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेळगाव सिमाभागातून प्रकाशित होणाऱ्या व महाराष्ट्र शासनाच्या मान्यता यादीवर असणाऱ्या मराठी वृत्तपत्रांना दरमहा दोन पुर्णपणे अतिरिक्त दर्शनी जाहिरात देण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याची मागणी लोकप्रतिनिधी व बेळगाव वृत्तपत्र संघ यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१), (२) व (३) कर्नाटक सीमाभागातील ५ वृत्तपत्रे व ५ साप्ताहीके महाराष्ट्र शासनाच्या शासनमान्य यादीवर गेल्या २० ते ३० वर्षापासून आहेत. या नियत कालिकांना शासन निर्णय दि.२० डिसेंबर २०१८ अन्वये काढलेल्या शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार एका आर्थिक वर्षात १० दर्शनी जाहीरातींचे वितरण करण्यात येते.

बेळगाव सिमाभागातून प्रकाशित होणाऱ्या व महाराष्ट्र शासनाच्या मान्यता यादीवर असणाऱ्या मराठी वृत्तपत्रांना दरमहा दोन पूर्ण अतिरिक्त दर्शनी जाहिरात देण्याच्या मागणीबाबतच्या प्रस्तावावर सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या नियमातील तरतुदीनुसार वस्तुस्थिती नमुद करुन प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत गिरगाव चौपाटीवर किनारपट्टी नियमन क्षेत्राची (सीआरझेड) परवानगी न घेता दर्शक गॅलरी बांधल्याबाबत

**(१४) ४८०४० (१७-०९-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत गिरगाव चौपाटीवर किनारपट्टी नियमन क्षेत्राची (सीआरझेड) परवानगी न घेता प्रेक्षकांसाठी दर्शक (व्हुविंग) गॅलरी बांधण्यात येत असल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गॅलरीच्या उत्तर टोकाला पावसाचे पाणी समुद्रात वाहून नेणारी महानगरपालिकेची पर्जन्य जलवाहिनी असल्यामुळे तसेच या गॅलरीमुळे समुद्री जीवांना देखील धोका निर्माण झाला असल्याने संबंधीतांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महानगरपालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यटनाच्या दृष्टीने मुंबईचा विकास होत असताना रितसर सर्व परवानग्या घेवून तसेच पर्जन्य जलवाहिनीचा मार्ग सोडून गॅलरीचे बांधकाम करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध प्राधिकरणाकडून लागणाऱ्या रीतसर परवानगीनूसार तसेच पर्जन्य जलवाहिनीचा मार्ग सोडून गिरगाव चौपाटी मुंबई येथे प्रेक्षकांसाठी दर्शक गॅलरी बांधलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नऊ हजार जलस्त्रोतांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) ४८३४७ (१०-११-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लघुसिंचन योजनांवर भर देऊन राज्यातील सुमारे नऊ हजार जलस्त्रोतांची दुरुस्ती करण्याची महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अशा किती जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करुन पाण्याची क्षमता वाढविण्यात आली तसेच अवर्षणप्रवण भागातील प्रकल्पांना प्राधान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुषंगाने सदरील योजनेतंर्गत दुरुस्तीसाठी लागणारा आवश्यक तो निधी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१२-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतंर्गत राज्यातील एकुण ७९१६ योजनांचा आराखडा तयार करण्यात आलेला असून त्यापैकी ४२७२ कामांच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतंर्गत मराठवाडा विभागातील एकुण ३७५५ योजनांचा आराखडा सादर करण्यात आलेला होता. त्यापैकी १३८६ कामांच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून ३२६ दुरुस्ती कामे पुर्ण झालेली आहेत व ४१८ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत सर्व कामे मार्च २०२३ अखेर पुर्ण करून प्रकल्पीय सिंचन क्षमता पुनस्थार्पित करण्याचे विभागाचे नियोजन आहे. सदरील १३८६ कामांची दुरुस्ती झाल्यावर एकुण १,५८,६६९ सघमी पाणीसाठा व ३४,४९८ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनस्थार्पित होणार आहे.

(३) भौतिकदृष्ट्या पुर्ण झालेल्या कामांची निधी मागणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महागनरपालिका अखत्यारित येणाऱ्या रूग्णालयांना औषधांचा पुरवठा होत नसल्यामुळे बाहेरून औषधे मागवावी लागल्याबाबत

**(१६) ४८४७९ (२५-०९-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महागनरपालिका अखत्यारित येणाऱ्या रूग्णालयांना औषधांचा पुरवठा होत नसल्यामुळे रूग्णांना बाहेरून औषधे मागविण्यास सांगितले जात असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयांना औषध खरेदीसाठी निविदा मागविण्याकरिता सात ते आठ महिने लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह राज्याच्या कानाकोपऱ्यातून रूग्ण वैद्यकीय उपचारांसाठी महानगरपालिकेच्या रूग्णालयांत येत असून हे गोरगरीब रूग्ण आर्थिक दुर्बल घटकातील असून त्यांच्याकडे पैसे नसल्यामुळे ते महानगरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये दाखल होत असून, गेल्या काही दिवसांपासून महानगरपालिकेच्या सर्वच रूग्णालंयामध्ये औषधांचा पुरेसा पुरवठा होत नसल्यामुळे रूग्णांचे हाल सुरू आहेत तसेच रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना खाजगी औषधांच्या दुकानांतून औषधे विकत घ्यावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये तसेच उपनगरीय रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या सर्व रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरिता महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत एकूण १२ औषध अनुसूची निर्गमित करण्यात येतात. त्यापैकी १० औषध अनुसूची निर्गमित करण्यात आल्या असून औषध अनुसूची क्रमांक २ व ३ निर्गमित करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

जम्बो कोव्हीड सेंटर बंद झाल्यानंतर त्यांचेकरीता राखीव परिमाणामध्ये औषध अनुसूची क्रमांक २ व ३ च्या बाबी समाविष्ट होत्या. त्यामुळे औषधांचा तुटवडा उद्भवू नये यासाठी त्यांची दरपत्रके निर्गमित करुन रुग्णालयांना औषधांचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच रुग्णालयीन स्तरावर स्थानिक पातळीवर तसेच ई–दरपत्रिकेद्वारे औषधे खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे वैद्यकीय भांडारात कमी प्रमाणात उपलब्ध असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने त्याचे पर्यायी औषध रुग्णास देण्यात येते.

तसेच उपचाराकरिता दाखल होणाऱ्या रुग्णांना आवश्यक असलेली औषधे महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत निविदा मागवून अनुसूची तयार करण्यात येते. त्यानुसार विविध अनुसूचीवरील जीवरक्षक औषधे रुग्णालयांच्या स्तरावर खरेदी करण्यात येतात. अनुसूचीचा कालावधी संपुष्टात आल्यास व पुढील कालावधीकरिता अनुसूचीच्या निविदांचे कामकाज काही तांत्रिक कारणांमुळे पूर्ण न झाल्यास मागील कालावधीच्या अनुसूचीतील कंत्राटदाराकडून त्याच किंमतीमध्ये जीवरक्षक औषधांची खरेदी रुग्णालय स्तरावर आवश्यकतेनुसार करण्यात येते. तसेच काही जीवरक्षक औषधे अनुसूचीवर उपलब्ध नसल्यास अशा औषधांची खरेदी रुग्णालय स्तरावर स्थानिक बाजारातून स्थळ दरपत्रिका मागवून आवश्यकतेनुसार करण्यात येते.

तसेच, दारिद्रय रेषेखालील गरीब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना महागडी जीवरक्षक औषधे खरेदी करण्याची आवश्यकता भासल्यास, रुग्णालयातील वैद्यकीय समाजसेवा विभाग, गरीब रुग्ण सहाय्यता निधी, जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतीबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी आरोग्य योजना अशा विविध योजनांमार्फत औषधे उपलब्ध करुन दिली जातात, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे भोलावडे (ता.भोर, जि.पुणे) येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहास निधी उपलब्धतेसह मंजूरी मिळणेबाबत

**(१७) ४८८७५ (२०-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोजे भोलावडे (ता.भोर, जि.पुणे) हे गांव भोर शहरापासून जवळ असून या परिसरात अनेक महाविद्यालये असून या ठिकाणी बाहेरगावहून अनेक मागासवर्गीय विद्यार्थी भोर येथे शिक्षणासाठी येत असतांनाही त्यांना राहण्याची सोय नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार या गावातील गट क्र.६१० मधील शासकीय जमीनीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी २०० खाटांचे वसतिगृह बांधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत भोर, ता.भोर, जि.पुणे येथे ७५ विद्यार्थी क्षमता असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह सन १९८६ पासून भाड्याच्या इमारतीमध्ये सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

भोर, ता.भोर, जि.पुणे या गावातील गट क्र.६१० मधील शासकीय जमीनीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी २०० खाटांचे वसतिगृह बांधण्याबाबतच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिल्याने सदर प्रकरणी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दि.१२.०३.२०१२ अन्वये खाजगी जमीन खरेदी करण्याकरिता उचित कार्यवाही करण्याबाबत सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिका क्षेत्रात बेकायदेशीररित्या वृक्षतोड करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१८) ४८८९० (३०-१०-२०२२). *श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :*** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक रोड (जि.नाशिक) विभागातील प्रभाग क्र.१९ मधील देवळाली शिवारातील (सर्व्हे नं.१९३-२०) खर्जुल मळ्यातील अनेक वृक्षांची तोड स्थानिकांच्या संगनमताने नाशिक महानगरपालिकेची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता दिनांक १० जुन, २०२२ रोजी वा त्यासुमारास वृक्षतोड करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे बेकायदेशीररित्या वृक्षतोड केल्याचे आढळून आल्यावर महानगरपालिकेने वृक्षतोड करणाऱ्यांना रुपये ४ लाख २० हजार रक्कमेचा दंड ठोठावल्याची नोटीस बजावून ही रक्कम सात दिवसांत महापालिकेकडे जमा करण्याची अन्यथा त्यांचेविरुध्द फौजदारी कारवाई करण्यांत येईल असे नोटीसीमध्ये आदेशित करण्यात आल्याचे दिनांक ११ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या सदर नोटीशीनुसार वृक्षतोड करणाऱ्या संबंधितांनी महापालिकेकडे दंडाची रक्कम भरणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, तसेच दंडाची रक्कम अद्याप भरणा न करणाऱ्यांविरुध्द सदर नोटीशीमध्ये नमुद केल्यानुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) होय.

नाशिकरोड विभागातील प्रभाग क्र.१९ मधील देवळाली शिवारातील सर्व्हे नं.१९३/२०ब, न्यु बालाजी ढाब्याशेजारी, जुना ओढा रोड, खर्जुल मळा, उड्डान पुलालगतच्या जागेत अनधिकृतरित्या वृक्षतोड होत असल्याचे दि.०९/०६/२०२२ रोजी नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणी दरम्यान निदर्शनास आले होते.

(२) होय.

अनधिकृत वृक्ष तोडल्याबाबत नाशिक महानगरपालिकेमार्फत दि.०९/०६/२०२२ अन्वये, एकूण ०७ वृक्षांच्या मुल्यांकनानुसार एकूण रु.४,२०,०००/- इतक्या रकमेच्या दंडाची नोटीस संबंधितांना बजावण्यात आली होती.

(३) नाशिक महानगरपालिकेने बजावलेल्या सदर दंडाच्या नोटीशीनुसार संबंधितांनी दि.१५/०६/२०२२ रोजी दंडाची एकूण रु.४,२०,०००/- इतकी रक्कम धनादेशाव्दारे महानगरपालिकेत भरणा केलेली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील गोजी लघू पाटबंधारे प्रकल्पातर्गत संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या शेत जमिनी परत करण्याबाबत

**(१९) ४९५२५ (१८-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील मौजे गोजी व येसंबा शिवारातील जमिनी सन २००१ मध्ये गोजी लघु पाटबंधारे प्रकल्पाकरिता संपादित करण्यांत आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य ठरत असल्याबाबतचा प्रस्ताव सहा प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य ठरत असल्यामुळे तो रद्द करुन संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अद्याप शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत केल्या नसल्याची कारणे काय आहेत व या जमिनी शेतकऱ्यांना केव्हा परत देण्यात येणार आहे, असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०२-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) व (४) प्रकल्प रद्द करून संबंधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्याबाबत विभागाने प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य ठरत असल्याबाबत कळविल्यामुळे याप्रकरणी प्रधान सचिव (मृद व जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०९/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत गोजी प्रकल्प रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, नागपूर यांचेमार्फत सादर करणेस्तव जिल्हा जलसंधारण अधिकारी, नागपूर यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार गोजी प्रकल्प रद्द करण्याबाबतचा कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-पुणे या दोन शहरातील अंतर कमी करणाऱ्या मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(२०) ४९५४० (१८-०१-२०२३) श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे या दोन शहरातील अंतर कमी करणाऱ्या मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम संथ गतीने सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम पुर्ण होण्याकरिता किती कालावधी लागणार आहे , सदर प्रकल्पावर किती निधी मंजूर केला असून या प्रकल्पाची आजातागायत कामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रत्यक्ष वाहतुक सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकल्पावर दिनांक २९.०८.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ पायाभुत सुविधा समितीच्या बैठकीत रुपये ६६९५.३७ कोटी भांडवली खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सद्य:स्थितीत प्रकल्प प्रगतीत असून अंदाजे ६०% काम पूर्ण झाले आहे. सदर प्रकल्प डिसेंबर, २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रकल्प पुर्ण होताच वाहतूक सुरु करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील इमारतीच्या टेरेसवर बेकायदेशीरपणे रुफ टॉप पद्धतीने रेस्टॉरंट व बार सुरु असल्याबाबत

**(२१) ४९५६४ (२६-१२-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील वाकड, हिंजवडी, माण, औंध, कोंढवा येथील अनेक इमारतींमध्ये सुरक्षिततेची काळजी न घेता मनपा प्रशासन पीएमआरडीए बांधकाम विभाग व ग्रामपंचायत प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता इमारतीच्या टेरेसवर रूफटॉप हॉटेल व बार अनधिकृतपणे सुरू असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच औंध कोंढवा परिसरातील रूफ-टॉप हॉटेलमध्ये आग लागून मोठ्या प्रमाणावर ग्राहक, कर्मचारी व मालमत्तेचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सॉफ्टवेअर कंपन्यांच्या परिसरातील इमारतींमध्ये उभारण्यात आलेल्या रुफटॉप हॉटेल व बारमध्ये मोठ्या प्रमाणावर तरुणाई पार्टी करण्याकरिता येत असल्याने प्रतिबंधक योजना नसल्याने व इमारतीला एकच वहिवाट असल्याने भविष्यात मोठ्या प्रमाणावर मनुष्य हानी होण्याची व सदर इमारतीमधील नागरिकांच्या असुरक्षिततेची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या रूफ टॉप हॉटेल, पब व बार यांच्यावर कारवाई करण्यात स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन पुणे महानगरपालिका हिंजवडी, माण, आयटी पार्क हद्दीतील बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या रूफ टॉप हॉटेल, बारवर कारवाई करण्याबाबत तसेच ज्या इमारतींवर सदर बेकायदेशीर रूफ टॉप हॉटेल, बार, पब सुरू आहेत त्या इमारतींवरील टेरेस सील करून वाढीव दराने कर आकाण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :**(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील औंध येथे व कोंढवा येथे इमारतीच्या टेरेसवर बेकायदेशीर रूफटॉप हॉटेल सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील वाकड परिसरात बांधकाम परवानगी न घेता रूफटॉप हॉटेल व बार अनधिकृतपणे बांधकाम केले नसल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

तसेच हिंजवडी व माण या गावांकरीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) असून सदर ठिकाणी अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नसल्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पुणे शहरातील गायकवाड आय टी पार्क, सानेवाडी, औंध, पुणे या ठिकाणी इमारतीच्या टेरेसवर बेकायदेशीर सुरू असलेल्या हॉटेलला दि.०८.०६.२०२२ रोजी व लुल्लानगर, कोंढवा खुर्द, पुणे येथील व्हेजीरा रेस्टॉरंट, मार्व्हल विस्टा, सहानी सुजन पार्क येथे दि.०१.११.२०२२ रोजी लागलेल्या आगीच्या घटनेत खुर्च्या, टेबल, फर्निचर, इलेक्ट्रीकल वायरींग इत्यादी साहित्य जळालेले आहे. या आगीमध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही.

(३) औंध, पुणे येथील आयटी ऑफीसच्या इमारतीमध्ये मान्य वापराव्यतिरिक्त रूफ टॉप हॉटेलचा अनाधिकृत वापर सुरू होता. त्याबाबत पुणे महानगरपालिका प्रशासनाने कारवाई करून बांधकाम निष्कासित केलेले आहे. सध्या जागेवर वापर बंद करण्यात आला असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कोणत्याही रुफ टॉप हॉटेल व बार करीता परवानगी दिलेली नाही. त्यामुळे सदरहू बाब पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाशी संबंधित नसल्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविलेले आहे.

(४) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील इमारतीच्या टेरेसवरील ६१ अनधिकृत रूफ टॉप रेस्टॉरेंटवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आलेली आहे..

तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी अनधिकृत बांधकामावरती वेळोवेळी कारवाई केली जात असल्याचे कळविलेले आहे.

(५) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील अशा स्वरूपाची अनधिकृत रूफ टॉप, रेस्टोरेंट इत्यादी बांधकामे निष्कासित केली जात नाही तोपर्यंत पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत या मिळकतींची आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६७ (अ) नुसार इमारतीच्या बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी शास्ती आकारणी केली जात असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

तसेच हिंजवडी, माण, आयटी पार्क हद्दीतील बेकायदेशीर असलेल्या रूफ टॉप हॉटेल, बार यांचे सर्वेक्षण झालेले नाही. अशा बांधकामांबाबत पुढील १ महिन्यामध्ये सर्वेक्षण करून अशा अनधिकृत बांधकामावरती कारवाई करण्यात येणार असल्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडणाऱ्या वांद्रे येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या पुलाच्या बांधकामाबाबत

**(२२) ४९६२० (१८-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडणाऱ्या वांद्रे येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या पुलाचा मोठा सिमेंट स्लॅब कोसळल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेमध्ये किती व्यक्ती जखमी व मृत पावल्या आहेत तसेच किती मालमत्तेचे नुकसान झाले आहे,

(३) असल्यास, वांद्रे-वर्सोवा-विरार सेतूचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उक्त सागरी सेतूच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व सदर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

माहिम उड्डाणपूलाचे बांधकाम सन १९९८ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. माहिम उड्डाणपूलाच्या अंतर्गत दोन पूलांचा समावेश आहे. कलानगर ते राजीव गांधी सागरी सेतू कडे व दुसऱ्या पूलावरुन राजीव गांधी सागरी सेतू ते कलानगर अशी वाहतुकीची दिशा आहे. या दोन्ही पुलांच्या मध्ये १.९५ मी चे अंतर आहे. या दोन्ही पूलांच्या मधील मोकळया जागेत सौंदर्यीकरणासाठी Precast concrete चे Panel ठेवण्यात आले होते व त्यावर अंशत: सुशोभिकरण करण्यात आले होते. माहे सप्टेंबर २०२२ मध्ये एक छोटा Precast Panel दिनांक १५.०९.२०२२ रोजी दुपारी १५.०० वा. पूलाखालील मोकळया जागेत पडला होता. सदर Precast Panel हा मुख्य पूलाचा स्लॅबचा भाग नाही.

(२) सदर घटनेत कोणीही जखमी अथवा मृत नाही तसेच कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाव्दारे वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूचे काम प्रगतीत आहे. तथापि, वर्सोवा विरार सागरी सेतु प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे प्रगतीत होते परंतु, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) १५३ व्या बैठकीतील चर्चा झाल्यानुसार प्रकल्प खर्च व निधी उभारण्याच्या कारणाहुन सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे दि.२२ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) हस्तांतरीत केला आहे.

(४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे वर्सोवा वांद्रे सागरी सेतू प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीत असून डिसेंबर, २०२६ अखेर बांधकाम पुर्ण करण्याचे नियोजन आहे व वर्सोवा विरार सागरी सेतू प्रकल्प दिनांक २२.११.२०२२ अन्वये नुकताच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना हस्तांतरीत झाला आहे.

(५) सदर ठिकाणी मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ घटनास्थळी पाहणी करुन सदर Precast Concrete चे Panel काढण्याच्या सूचना दिल्या व त्यानुसार हे Precast Concrete चे Panel काढण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) एमआयडीसीतील रसायनयुक्त सांडपाणी सावित्री नदीपात्रात सोडल्याबाबत

**(२३) ४९८०१ (२६-१२-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) एमआयडीसीतील काही कारखानदारांकडून रसायनयुक्त सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट सावित्री नदीच्या पात्रात सोडण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाचा फायदा घेऊन केमिकल कंपन्यांनी सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता रसायनयुक्त पाणी नदयांमध्ये सोडल्यामुळे दादली पूल ते भाई घाट परिसरातील पाण्याला दुर्गंधी येत असून पाण्याचा रंग लालसर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या दोषी कंपन्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या दोन उदयोगांना उत्पादन बंदचे आदेश, एका उद्योगास प्रस्तावित निर्देश व एका उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात शासनाची मान्यता नसलेल्या मोटार ड्रायव्हींग स्कूलच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२४) ४९८६० (२२-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात शासनाची मान्यता नसलेल्या मोटार ड्रायव्हींग स्कूलच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल तालुक्यात एकूण ड्रायव्हींग स्कूल किती आहेत व किती ड्रायव्हींग स्कूल शासनाची मान्यता प्राप्त आहे व किती ड्रायव्हींग स्कूल बेकायदेशीररित्या सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शासनाची कोणतीही मान्यता न घेता मोठया प्रमाणात मोटर ड्रायव्हींग स्कूल सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मोटर ड्रायव्हींग स्कूलमार्फत नागरिकांकडून भरमसाठ फी आकारत असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या ड्रायव्हींग स्कूलकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१) नाही.

(२) पनवेल तालुक्यात एकूण ७४ शासन मान्यताप्राप्त मोटार ड्रायव्हींग स्कूल आहेत.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील सिडकोचे कार्यालय पूर्ववत सुरु घरे फ्री होल्ड करण्याबाबत**

**(२५) ४९९२० (२०-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिडको महामंडळाचे कार्यालय बंद करण्याचा शासनाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी निर्णय घेतल्यामुळे नाशिक शहरातील विविध राजकीय व सामाजिक संघटनांनी या निर्णयाचा तीव्र निषेध केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने घेतलेला निर्णय तात्काळ रद्द करून नाशिक येथील सिडकोचे कार्यालय पूर्ववत सुरु ठेवावे तसेच नाशिक येथील सिडकोची लिज होल्ड्ची घरे फ्री होल्ड करण्याचा निर्णय घ्यावा अशी मागणी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक येथील सिडकोचे कार्यालय पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत तसेच नाशिक येथील सिडकोची घरे फ्री होल्ड करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१), (२) व (३) सिडकोचे नाशिक येथील कार्यालय बंद करुन तेथील अधिकारी / कर्मचारी यांची इतरत्र रिक्त पदांनुसार पदस्थापना देणेबाबत शासनाच्या दि.०१.११.२०२ च्या पत्रान्वये सिडकोस कळविण्यात आले होते. तथापि, सिडकोने भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी, लिज होल्ड ते फ्री होल्डसम करण्याची व इतर अनुषंगिक बाबींची कार्यवाही अद्यापि प्रलंबित असल्याने सदर कामाकरीता आवश्यक असणारा कमीत कमी लिपीक वर्गीय कर्मचारी वर्ग नाशिक कार्यालयात कायम ठेऊन अन्य अधिकारी / कर्मचारी, विशेषत: तांत्रिक संवर्ग, यांना आवश्यकतेनुसार इतरत्र पदस्थापना देण्याबाबत शासनाच्या दि.०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सिडकोस कळविण्यात आले आहे. नाशिक येथील सिडको संबंधित कोणत्याही कामकाजावर परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.

नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडको महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या जमीनींचा विकास करुन सिडकोने भाडेपट्टयाने वाटप केलेल्या जमिनीच्या भाडेपट्टा कालावधीमध्ये वाढ करण्याबाबत सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.११९१२, दि.११.८.२०१७ च्या प्रस्तावास दि.२०.१२.२०१८ रोजी मान्यता देण्यात आली आहे. तसेच नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) नियमावली, २००८ तसेच नवीन शहरे जमीन विनियोग नियमावली, १९९२ मध्ये सुधारणा करण्यास दि.९.३.२०१९ रोजी मान्यता देण्यात आली आहे. औरंगाबाद व नाशिक येथील नवीन शहरांसाठी सिडकोच्या जमीन भाडेपट्टा सुधारणा योजना अधिमूल्य / शुल्क रक्कमेत सवलत देण्यासाठी सिडको संचालक मंडळाने पारीत केलेला ठराव क्र.१२२९८, दि.७.२.२०२० च्या अनुषंगाने पुढील कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र –कर्नाटक सीमाप्रश्न संबंधित उच्चधिकार समितीची**
**बैठक आयोजित करुन वकिलांची नेमणूक करण्याबाबत**

**(२६) ४९९६० (१८-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नावर संबंधित उच्च्चाधिकार समितीची बैठक तीन महिन्यांपासून झाली नसल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सीमाप्रश्नी न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडणाऱ्या तीनपैकी दोन वकिलांनी वैयक्तिक कारणास्तव बाजू मांडण्यास असमर्थता दर्शवली असल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्राची बाजू मांडण्याकरिता उच्चाधिकार समिती नेमण्यासंदर्भात तसेच नव्याने वकील नेमण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात पुनर्रचना करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीची मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१.११.२०२२ रोजी बैठक झाली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

श्री.राजू रामचंद्रन, वरिष्ठ वकील यांनी असमर्थता दर्शविली आहे.

(३) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.११.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये उच्चाधिकार समितीची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र.०४/२००४ चे कामकाज पाहण्यासाठी नेमलेल्या वकीलांच्या पॅनलमध्ये विशेष समुपदेशी म्हणून वरिष्ठ विधिज्ञ श्री.राकेश व्दिवेदी व श्री.सी.एस.वैद्यनाथन यांची अनुक्रमे दि.०९.१०.२०१९ व दि.०६.०१.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकासकामांना दिलेली स्थगिती रद्द करण्याबाबत

**(२७) ४९९९८ (२४-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१, दिनांक ३ मार्च, २०२२ व दिनांक ३१ मार्च, २०२२ या शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या विकास कामांना दिलेली स्थगिती रद्द करून या कामांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त विकास कामांना दिलेली स्थगिती रद्द करून सदर कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) होय,
(२) सदर विकास कामांना स्थगिती देण्यात आलेली नव्हती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिघी-पुणे (ता.म्हसळा, जि.रायगड) राज्यमार्ग एफ-०३७१ या नवीन मार्गासाठी ब्लास्टींगचे काम सुरु असल्याने मौजे खारगाव खुर्द गावातील अनेक घरांना तडे गेल्याबाबत

**(२८) ५०१०३ (१८-०१-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिघी-पुणे (ता.म्हसळा, जि.रायगड) राज्यमार्ग एफ-०३७१ या नवीन मार्गासाठी ब्लास्टींगचे काम सुरु असल्याने मौजे खारगाव खुर्द गावातील अनेक घरांना तडे गेल्याने गावकऱ्यांनी काम थांबविण्याची मागणी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारगाव ग्रामस्थ व ग्रामपंचायतीने म्हसळा तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सदर दगड तोडण्याचे काम यंत्राव्दारे करण्यात येत आहे.
(२) याबाबत कोणतेही निवेदन तहसिलदार / ग्रामपंचायत यांचेकडून प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माणगाव (जि.रायगड) नगरपंचायतीने घरपट्टी व नळपाणीपट्टी दरात दुपटीने केलेली वाढ रद्द करण्याबाबत**

**(२९) ५०१५४ (२०-०१-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) नगरपंचायतीने घरपट्टी व नळपाणीपट्टी दरात दुपटीने वाढ केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माणगाव नगरपंचायतीने घरपट्टी व नळपाणीपट्टी दरात वाढ करीत असतांना नागरिकांना कोणतीही आगाऊ सूचना न देता दरवाढ केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार केलेली दरवाढ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) माणगांव नगरपंचायतीने पाणीपट्टी (नळपाणीपट्टी) करात वाढ केली असून सद्य:स्थितीत मालमत्ता (घरपट्टी) करामध्ये कोणतीही दरवाढ करण्यात आली नसल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नगरपंचायत सर्वसाधारण सभेने पाणीपट्टीच्या दरामध्ये वाढ करण्याचा ठराव मंजूर केला. तथापि सदर ठराव व त्याबाबतची नोटीस नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रसिध्द केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नसल्याने याप्रकरणी तपासणी करुन नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासनाच्या विविध स्वरुपातील योजनांचा लाभ घेणाऱ्या निराधारांना हयातीचे व उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अनुदान बंद केल्याबाबत**

**(३०) ५०१९१ (२४-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या विविध स्वरुपातील योजनांचा लाभ घेणाऱ्या निराधारांना हयातीचे व उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांचे अनुदान बंद करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी तसेच पुणे जिल्ह्यातील निराधारांना उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळण्यास गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याने त्यांना प्रमाणपत्र मिळण्यासाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रमाणपत्रे व दाखले जमा करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे काय व त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) असल्यास, निराधार लाभार्थी यांच्याकडून जिल्हा प्रशासनाकडे महासेवा केंद्र, तलाठी व इतर ठिकाणी निराधारांसाठी तातडीने उत्पन्नाचा दाखला मिळविण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निराधार लाभार्थ्यांना शासकीय अनुदानापासून वंचित राहू नयेत याकरीता शासनाने उत्पनाचा दाखला तात्काळ मिळण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना हयातीचे प्रमाणपत्र व उत्पन्न दाखला जमा करण्यास मुदतवाढ देण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील एजी डॉटर्स या कंपनीने अनधिकृतपणे बांधकाम केल्याबाबत**

**(३१) ५०३०० (२०-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील एजी डॉटर्स या कंपनीसोबत कणकवली नगरपंचायतीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करार केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीला नगरपंचायतीने जमिनीचा ताबा दिलेला नसतांनाही सदर कंपनीने अनधिकृतपणे बांधकाम केल्याचे माहे नाव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने अनधिकृतपणे करण्यात आलेल्या बांधकामावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कणकवली नगरपंचायतीने एजी डॉटर्स या कंपनीला घनकचरा व्यवस्थापनासाठी भाडे तत्वावर जागा वापरण्यास दिली असून सदर ठिकाणी कंपनीने प्रिकॉस्ट स्वरुपाची कंपाऊंड वॉल (Movable) व तात्पुरत्या स्वरुपाच्या दोन प्रिकॉस्ट कॉंक्रिट केबिन (Movable) ठेवलेल्या आहेत.
सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कायमस्वरुपी बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे कारवाई करण्यात आली नसल्याचे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर-मुंबई महामार्गाचे धर्तीवर नागपूर-गोवा महामार्ग बनविण्याबाबत**

**(३२) ५०३७७ (१८-०१-२०२३). श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर, नागपूर ते गोवा एक्सप्रेस वे (इकॉनॉमिक कॉरिडॉर) बनविण्याचे शासनाचे विचाराधीन असल्याचे मा.उपमुख्यमंत्री यांनी नागपूर येथे नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरेडको) विदर्भ चॅप्टरच्या वतीने आयोजित शासकीय कार्यक्रमात जाहीर केल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर महामार्ग किती किलोमीटर लांबीचा असून किती निधी खर्चित होणार आहे व या महामार्गाच्या बांधकामास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे काय,

(३) असल्यास, सदरचा महामार्ग कोणकोणत्या जिल्ह्यातून जाणार आहे व तेथील जमिन संपादनाबाबत व शासकीय यंत्रणांच्या परवानगीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नागपूर ते गोवा द्रुतगती मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत व निविदांची छाननी प्रगतीत आहे. तथापि, या मार्गाची ढोबळ मानाने अंदाजे लांबी ७६० कि.मी. असून ढोबळमानाने प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रुपये ८६,३०० कोटी एवढा आहे. तद्नंतर सदर प्रकरणी मा.मंत्रीमंडळाची/ मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीकडे मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(३) सदर महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदूर्ग या १२ जिल्हयातून पुढे कोकण द्रुतगती महामार्गास गोवा महाराष्ट्र सरहद्दीवर जोडणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाची लांबी, जाणारे जिल्हे, प्रकल्पाचा एकूण खर्च इत्यादी बाबी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर निश्चित होतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विविध विभागातील १० लाख ७० हजार मंजूर पदांपैकी सुमारे अडीच लाख पदे रिक्त असल्याबाबत

**(३३) ५०४३५ (१८-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध विभागातील १० लाख ७० हजार मंजूर पदांपैकी सुमारे अडीच लाख पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षापासून राज्यातील नोकरभरतीमध्ये होणारे गैरव्यवहार व गैरप्रकार विचारात घेता नोकर भरतीत पारदर्शकता यावी यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची व्याप्ती वाढवून आणि आयोग सक्षम करुन सगळी भरती त्यांच माध्यमातून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट "ब" अराजपत्रित आणि गट "क" व "ड" वर्गातील सर्व जागा पुन्हा दुय्यम सेवा निवड मंडळाच्या माध्यमातून भरण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी सर्व पदांची भरती एमपीएससीतर्फे करावी तसेच एमपीएससीचे सक्षमीकरण करावे, अशी मागणी स्टुडंट राइट्सने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यापूर्वी दुय्यम सेवा निवड मंडळाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या निवड प्रक्रियेत गैरव्यवहार व गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास येऊनही पुन्हा दुय्यम सेवा निवड मंडळाच्या माध्यमातून निवड प्रक्रिया राबविण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) डिसेंबर २०२० अखेरपर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्य शासकीय सेवा आणि जिल्हा परिषद सेवा यामधील सरळसेवा व पदोन्नती या दोन्ही कोट्यांच्या मिळून १०,७०,८४० इतक्या मंजूर पदांपैकी २,४४,४०५ इतकी पदे रिक्त होती.

(२) भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) सरळसेवेने भरावयाची गट-क मधील लिपिकवर्गीय संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास दिनांक २/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून, यापैकी प्रथम टप्प्यात लिपिक-टंकलेखकांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणार आहेत. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयाच्या सक्षमीकरणासाठी २७१ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. आयोगाचे १ अध्यक्ष व ४ सदस्य यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच, आयोगास वेळोवेळी आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.
(३) अशी वस्तुस्थिती नाही.
(४) अशा मागणीची निवेदने काही लोकप्रतिनिधी व संस्थांकडून शासनास प्राप्त झालेली आहेत.
(५) व (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क संवर्गातील रिक्त पदे दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत भरण्यात येत होती. सदर निवड मंडळे दिनांक ११/०६/१९९९ रोजी बरखास्त करण्यात आली. निवडमंडळे बरखास्त झाल्यानंतर आजतागायत सदर पदे जिल्हास्तरीय /प्रादेशिकस्तरीय/राज्यस्तरीय निवड समित्यांच्या माध्यमातून भरण्यात येत आहेत.

---

## वर्सोवा-वांद्रे-सी-लिंक हा प्रकल्प मुंबईतील असूनही याच्या नोकरभरतीसाठी मुलाखती चेन्नईत घेतल्याबाबत

**(३४) ५०५४९ (२७-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्सोवा-वांद्रे-सी-लिंक हा प्रकल्प मुंबईतील असूनही याच्या नोकर भरतीसाठी मुलाखती चेन्नईत घेतल्या जाणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेदांता फॉक्सकॉन व रायगडमधील बल्क ड्रग पार्क हे प्रकल्प राज्याबाहेर गेल्याने येथील तरुणांचा रोजगारही बुडाला असतानाच सी-लिंक प्रकल्पासाठी नोकरभरती चेन्नईत करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यात औद्योगिक प्रकल्प यावेत तसेच उक्त मुलाखती मुंबईतच घेण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्पासाठी नियुक्त ई.पी.सी.कंत्राटदारामार्फत कंत्राटदार कंपनीमध्ये नोकरभरतीसाठी वेगवेगळया ठिकाणी मुलाखती घेतल्या जात आहेत.
(२) सदर प्रकल्प हा सागरी सेतू असून वैशिष्टयपुर्ण आहे. सदर ई.पी.सी.कंत्राटदारामार्फत सदर प्रकल्पासाठी एकूण ४८ वेळा मुलाखती घेण्यात आल्या आहेत. यापैकी ४७ वेळा मुलाखती या मुंबई मध्ये घेण्यात आल्या आहेत. तथापि, सागरी कामाचे अनुभव असलेले उमेदवार न मिळाल्यामुळे व चेन्नई हा सागरीभाग असल्यामुळे चेन्नई येथे एक वेळ मुलाखत आयोजित करण्यात आली होती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान मिळण्याबाबत

**(३५) ५०६७३ (२६-१२-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रत्नागिरी व धुळे, भंडारा, परभणी जिल्ह्यातील संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेअंतर्गत निराधार, दिव्यांग, वृद्ध तसेच विधवा महिला अशा व्यक्तींना केंद्र आणि राज्य शासनाच्या सहभागातून मिळणारे एक हजार रुपयांचे अनुदान प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय ,

(२) तसेच पूर्णा तालुक्यातील (जि.परभणी) निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे अनुदान तहसिलदार, पूर्णा यांच्या अनागोंदी कारभारामुळे गेल्या तीन महिन्यापासून प्रलंबित असल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने थकीत अनुदान तातडीने देण्याबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१) व (२) रत्नागिरी, धुळे, भंडारा व परभणी जिल्ह्यातील तसेच परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यामधील राज्यपुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनांचे अर्थसहाय्य माहे एप्रिल, २०२२ पासून PFMS (Public Finance Management System) प्रणालीमधूनच वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. सदरहू योजनांसाठी सर्व जिल्हाधिकारी यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये PFMS प्रणालीवर अनुदान वितरीत करण्यात आलेले असून लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्याची कार्यवाही तालुकास्तरावर सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिंचणी-तारापूर (जि.पालघर) सागरी महामार्गालगतच्या अवैध बांधकामामुळे तिवरांच्या झाडांची कत्तल होत असल्याबाबत

**(३६) ५०७४६ (१९-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचणी-तारापूर (जि.पालघर) येथे सागरी महामार्गालगत अवैध बांधकामामुळे तिवरांच्या झाडांची कत्तल सुरु असूनही त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गालगत कांदळवनांची कत्तल केल्याने जमिनीची मोठ्या प्रमाणात धुप होत असल्याचेही निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने तिवरांची झाडांची कत्तल करुन अवैध बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही

(३) व (४) प्रस्तूत प्रकरणी चौकशी अंती कांदळवन वृक्षांची कोणतीही तोड झाल्याचे दिसून आलेले नाही.

---

## नाशिक शहरातील नंदिनी नदीच्या प्रदूषणाबाबत

**(३७) ५०८८० (२६-१२-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्रंबकेश्वर (जि.नाशिक) येथून उगम असलेली व नाशिक शहरातून वाहत गोदावरी नदीत मिळणाऱ्या नंदिनी नदीमध्ये नाशिक शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता मिसळत असून याकडे नाशिक महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदिनी नदीत सोडले जाणारे सांडपाणी हे पुढे गोदावरी नदीमध्ये मिसळत असल्याने गोदावरी प्रदूषणास कारखान्याबरोबरच महानगरपालिकेचे प्रशासन देखील जबाबदार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार नंदिनी नदी स्वच्छ करण्यासाठी व नदीत होणारे प्रदूषण रोखण्यासाठी नाशिक महानगरपालिकेकडून तातडीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

नंदिनी नदीच्या तिरावर टाकण्यात आलेल्या मलवाहिका सुमारे २२ वर्षापुर्वी टाकलेल्या असून, सद्यस्थितीत त्यांची क्षमता कमी पडत आहे. त्याकरीता नाशिक महानगरपालिकेने वाढणाऱ्या लोकसंख्येचा विचार करुन शहराच्या जुन्या मलवाहिका बदलण्यासाठी सर्वे करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी गोदा प्रकल्प अंतर्गत सल्लागार नेमण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(२) व (३) राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रासाठी मलजल व्यवस्थापना करीता सर्वंकष असा मलनि:स्सारण व्यवस्थापन आराखडा महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आला असून, याबाबतचा रु.५३०.३१ कोटी रकमेचा सुधारित प्रकल्प अहवाल दि.११/११/२०२२ रोजी केंद्र शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

तसेच, नाशिक महानगरपालिकेने नविन विकसित भागात सुमारे १५० कि.मी. लांबीची मलवाहिका टाकण्यासाठी रु.३०० कोटीचा प्रस्ताव अमृत २.० योजनेअंतर्गत प्रस्तावित आहे.

गोदावरी नदीत प्रदूषण होऊ नये व त्याचे संनियंत्रण करण्यासाठी महानगरपालिकेने स्वतंत्र गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन केला आहे.

गोदावरी नदी व तिच्या उपनद्या प्रदूषण मुक्त करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने दिर्घ मुदतीच्या व तातडीने करावयाच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यासाठी केंद्र शासनाच्या निरी या संस्थेच्या मार्गदर्शनानुसार गोदावरी नदी पात्र स्वच्छ व प्रदूषण मुक्त करण्यासाठी नाशिक महानगरपालिका सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील जिल्हा प्रशासनाकडे योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत

**(३८) ५१०६२ (१८-०१-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्यासंबंधित कुटुंबातील वारसांना केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थसाह्ययोजनेतंर्गत २० हजाराचे अर्थसहाय्य दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील जिल्हा प्रशासनाकडे योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान देण्यासाठी राज्य शासनाकडून माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निधी आलेला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लाभार्थ्यांना त्वरित निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचे अर्थसहाय्य माहे एप्रिल, २०२२ पासून PFMS (Public Finance Management System) प्रणालीमधूनच वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. सदरहू योजनेसाठी सर्व जिल्हाधिकारी यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये PFMS प्रणालीवर अनुदान वितरीत करण्यात आलेले असून लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्याची कार्यवाही तालुकास्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळी वैजयनाथ (जि.बीड) तालुक्यात भूगर्भातून आलेल्या गूढ आवाज व कंपनाबाबत**

**(३९) ५१२०२ (२२-०१-२०२३). श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी वैजनाथ (जि.बीड) तालुक्यातील अनेक गावांमध्ये भूगर्भातून गूढ आवाज येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आलेआहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील परचुंडी मलनाथपूर परिसरात जमिनीतून गूढ आवाज येत असल्याने भिंतींना तडे जाणे, पत्रे हादरने यासारख्या घटना घडत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या गूढ आवाजामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. परळी तालुक्यातील परचुंडी या गावात सदर आवाज येत असल्याची नोंद तहसीलदार, परळी यांनी दि. २७.१०.२०२२ च्या पत्राद्वारे कळविले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही. हे खरे नाही.
(४) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा बीड मंडल अधिकारी व तलाठी यांचेकडुन दि. २८.१०.२०२२ रोजी संयुक्त पाहणी करण्यात आली असून पाहणी अंती गाावामध्ये अंदाजे २५० ते ४५० खोलीच्या ५५ विंधन विहीरी असल्याबाबत उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले. तसेच आवाज येत असणाऱ्या परिसरामध्ये ३० विहीरी असून विहिरींची खोली १५ ते १८ मी पर्यंत आहे. सध्या विहीरींची पाणी पातळी १ ते २ मी इतकी आढळुन आली. उपस्थित ग्रामस्थांनी विहीरीच्या पाणी पातळीमध्ये कुठलाही बदल आढळुन आला नाही असे सांगितले व सर्वेक्षणाच्या वेळी तसे आढळुन आले नाही. सदर आवाज आणि कंपन हे त्या परिसरातील भूस्तरांमधील पोकळीमध्ये पावसानंतर भूजल व हवेची पोकळी यामधील परस्पर क्रिया घडून येत असल्याकारणाने आवाज येत असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यापूर्वी अश्या प्रकारच्या घटना पावसाळ्या दरम्यान मराठवाडयातील डेक्कन ट्रॅप बेसॉल्ट भूभागात आढळतात, असा अहवाल भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड यांनी सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून सुशासन नियमावली करण्याबाबत

**(४०) ५१२४७ (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून सुशासन नियमावली करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात प्रामुख्याने कृषी, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आदिवासी विकास, रोजगार निर्मिती या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या सेवा नागरिकांना अधिक सुलभ व पारदर्शी पद्धतीने देण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून उक्त प्रकरणी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१), (२) व (३) प्रशासन उत्तरदायी सुलभ, स्वच्छ, पारदर्शी आणि गतीमान करण्याकरीता सुशासन नियमावलीचा मसुदा तयार करून शासनास सादर करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे.

(४) व (५) सदर समितीचे कामकाज सुरू असून समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

---

## श्रीवर्धन (जि.रायगड) येथील खाणी आळी परिसरातील इमारतीला भीषण आग लागल्याबाबत

**(४१) ५१३०६ (२०-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) येथील खाणी आळी परिसरात श्रीवर्धन पोलीस ठाण्यासमोर असलेल्या इमारतीला भीषण आग लागल्याची घटना दिनांक ६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमध्ये अग्निशमन यंत्र बसविण्यात आले होते काय, असल्यास आग लागण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर इमारतीमध्ये मनोहर इलेक्ट्रानिक्स आणि फर्निचर व इतर दुकाने असून मोठया प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दुर्घटनेची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर इमारत खाजगी मालकीची असून त्यामध्ये अग्नीशमन यंत्र बसविण्यात आलेले नाही.

तलाठी सजा श्रीवर्धन व पोलीस स्टेशन श्रीवर्धन यांचेकडील नोंदीवरुन सदरची आग आकस्मिक / अज्ञात कारणाने लागल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) याबाबत श्रीवर्धन पोलीस स्टेशन यांचेमार्फत अधिक तपास सुरु आहे.

सदरची बाब नैसर्गिक आपत्तीमधील आर्थिक मदत देय असणाऱ्या निकषात येत नसल्यामुळे नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत अदा करण्यात आली नसल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडवणी (जि.बीड) शहरातील विद्युतीकरणाचे काम न करताच ठोक तरतुद योजनेअंतर्गत देयके अदा केल्याबाबत

**(४२) ५१४०२ (२६-१२-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी (जि.बीड) शहरातील वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुद योजना अंतर्गत विद्युतीकरणाचे काम न करताच देयक अदा केल्याने सौ.सोनाली सतिष बडे यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक व स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याबाबत जिल्हा प्रशासक अधिकारी, नगरविकास विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी दिनांक १५ एप्रिल, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी नगरपंचायत, वडवणी, जि.बीड यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्याधिकारी नगरपंचायत वडवणी जि.बीड यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजीपर्यंत आपला अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी अहवाल अद्यापही न पाठविणाऱ्या तसेच बेकायदेशीररित्या देयक अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने दि.०५.१२.२०२२ रोजी मुख्याधिकारी, वडवणी नगरपंचायत यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचा तात्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने दि.०७.१२.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्या स्तरावर चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवलेवाडी (जि.पुणे) परिसरात मोठ्या प्रमाणात डोंगरफोड करुन भुखंड विक्रीचा व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(४३) ५१५०८ (२६-१२-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कोंढवा व येवलेवाडी या भागात मोठ्या प्रमाणावर डोंगरफोड करून भूखंड विक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने तसेच डोंगरावरुन वाहत येणारे नैसर्गिक नाले दोन्ही बाजुने भर टाकून त्यांची रुंदी कमी केल्याने पावसाळ्यात नाल्याचे पाणी रस्तावर येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकरणी येवलेवाडीचा विकास आराखडा मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या व येवलेवाडी-कोंढवा या परिसरात निर्माण झालेल्या समस्यांस जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांचेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे. कोंढवा व येवलेवाडी परिसरात अनाधिकृत डोंगरफोड करुन प्लॉटींग सुरू असलेल्या ठिकाणांबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी पत्रव्यवहाराद्वारे कळविले असून महापालिकेच्या बांधकाम विभागामार्फत सदर अनाधिकृतरित्या केलेल्या प्लॉटींगवर व बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३(१अ) अन्वये नोटीस बजावून निष्कासन कारवाई करणेत येत आहे. तसेच कोंढवा व येवलेवाडी परिसरातील नैसर्गिक नाल्यांची मलःनिसारण विभागामार्फत वेळोवेळी साफसफाई, देखभाल व दुरुस्तीसुध्दा महानगरपालिकेकडून करणेत येत आहे.
(२) पुणे महानगरपालिकेने पुणे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची (येवलेवाडी) विकास योजना तयार करुन दि.१२.१०.२०१८ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनाच्या मंजूरीसाठी सादर केली आहे. सदर प्रारुप विकास योजने संदर्भाने, शासनस्तरावर विकास योजना छाननी समितीच्या दि.३०.०९.२०२१ रोजीच्या बैठकीतील शिफारसी अंतर्भुत करून प्रारुप विकास योजना अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये शासनाचे अंतिम मंजूरीस्तव दि.२१.०४.२०२२ रोजी सादर करण्यात आली असून त्यास अधिनियमातील तरतुदीनुसार मान्यता देण्याचे प्रस्तावितआहे.
(३) व (४) येवलेवाडी-कोंढवा परिसरातील अनाधिकृत प्लॉटींग व बांधकामावर आवश्यक कारवाई तसेच नैसर्गिक नाल्यांची साफसफाई, देखभाल व दुरुस्ती पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असल्याने, शासनाद्वारे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून प्रवाशांची लूट होत असल्याबाबत**

**(४४) ५१५२५ (२२-०१-२०२३). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिवाळी, दसरा या सणांच्या कालावधीत खाजगी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्स चालकांकडून प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर लूट केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यात किती खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्या शासकीय नियमांचे उल्लंघन करुन अधिक तिकीट दर आकारीत असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंपन्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) होय.
(२) दिनांक २७.०४.२०१८ रोजी शासन निर्णयान्वये संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रति कि.मी. भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही असे कमाल भाडेदर निश्चित केले आहे. याप्रमाणे सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना परिवहन आयुक्त कार्यालयाद्वारे दि.१९.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तपासणीचे निर्देश देण्यात आले आहे.
(३) जादा भाडे आकारणाऱ्या एकूण ३०३ दोषी वाहनांवर सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडून कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी प्रवासी बस वाहतुकदारांवर कारवाई करण्याबाबत

**(४५) ५१५२७ (१९-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या परिवहन विभागाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी प्रवासी बस वाहतुकदारांवर कारवाईसाठी विशेष तपासणी मोहीम हाती घेतली असुन या मोहिमेत आतापर्यंत १ हजार १८१ बसमध्ये वाहतूक नियमांचे पालनचे होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यत १ हजार १८१ बसमध्ये वाहतूक नियमांचे पालनच होत नसल्याचे आढळले असुन या बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणे, अग्निशमन यंत्रणा नसणे, धोकादायक वाहतूक असे प्रकार सर्रास होत असल्याने या बसमधुन प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना परिवहन आयुक्त कार्यालयाद्वारे दि. १०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि. ०९.१०.२०२२ ते दि. २३.१०.२०२२ या कालावधीत खाजगी बसेस तपासणीचे निर्देश देण्यात आलेले होते. सदर तपासणी मोहीमेमध्ये राज्यातील एकूण ३८८५ दोषी वाहनांकडून रू.९९ लाख इतकी दंड वसूली करण्यात आली.

(२), (३) व (४) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकांमार्फत केलेल्या तपासणीमध्ये राज्यातील एकूण १३६६ खाजगी बसमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या दोषी वाहनांवर महाराष्ट्र मोटार वाहन नियम १८८ नुसार प्रतिवेदीत करण्यात आले आहे.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील रिंगरोड प्रकल्पाबाबत

**(४६) ५१७५२ (१८-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडी दूर करण्यासासठी शासनाने रिंगरोडचा प्रकल्प सुरु करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी १५८५.४७ हेक्टर एवढी जमीन संपादित केली जाणार असून पूर्व भागातून ४६ तर पश्चिम भागातील ३७ गावांमधून हा रिंगरोड जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रिंगरोडच्या पूर्व भागातील दुसऱ्या टप्प्याला स्तिअरिंग कमिटीने मान्यता दिल्यामुळे त्या रस्त्याच्या सर्वकष प्रकल्प अहवालानुसार या रिंगरोडचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पासाठी संपादित केल्या जाणाऱ्या जमिनीचा दर निश्चिती करुन बाधितांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत : खरे आहे.

पुणे चक्राकार मार्गाच्या पश्चिम आखणीमध्ये एकूण ३७ गावे बाधित होत असून अंदाजे एकूण ६८८.६८ हेक्टर खाजगी जमीन संपादित करावी लागणार आहे. पूर्व आखणीमध्ये एकूण ४६ गावे बाधित होणार असून अंदाजे एकूण ८५९.८८ हेक्टर खाजगी जमीन संपादित करावी लागणार आहे.
(३) होय, हे अंशत : खरे आहे.

पुणे चक्राकार मार्गाच्या प्रकल्पास स्टिअरिंग कमिटीने मान्यता दिली असून प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ड्रोन तसेच डीजीपीएस द्वारे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
(४) प्रकल्पासाठी संपादनाची कार्यवाही महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ (सुधारीत २०१८) अन्वये करण्यात येत असून संपादित जमिनीचा मोबदला भूसंपादन अधिनियम २०१३ मधील (LARR Act २०१३) कलम २६ ते ३० चे तरतूदीनुसार अदा करण्यात येणार आहे. पुणे (पूर्व) चक्राकार मार्गातील एकूण ४६ गावापैकी ४१ गावांचे भूसंपादनाची अंतिम कलम १८(१) ची अधिसूचना दिनांक १७.०५.२०२२ रोजी राजपत्रात प्रसिध्द झाली आहे व पुढील मुल्यांकनाची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाकडे प्लास्टिक कचऱ्याच्या पद्धती लावण्यासंदर्भात दंड भरावा लागल्याबाबत**

**(४७) ५१७५४ (२६-१२-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाकडे प्लास्टिक कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्यासंदर्भात कृती योजना सादर न केल्यामुळे राज्याला दरमहा एक कोटी रुपयाचा दंड भरावा लागणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात प्लास्टिक पिशव्या वापरण्यावर बंदी असतानाही पातळ प्लास्टिकच्या पिशव्या आणि इतर प्लास्टिकच्या वस्तूंचा साठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणण्यासाठी शासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

तथापि, एकल वापर प्लास्टिक अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने कृती आराखडा तयार केला असून दि. ०८ फेब्रुवारी, २०२२ रोजी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर केला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणू), अधिसूचना, दि. २३.०३.२०१८ रोजी प्रसिध्द केली आहे. ज्यामध्ये दि. ११ एप्रिल २०१८, दि. ३० जून २०१८, दि. १४ जून २०१९, दि. २८ मार्च २०२२, दि १५ जुलै २०२२ आणि दि. ३० नोव्हेंबर २०२२ च्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर विविध विभागांमार्फत कारवाई करण्यात येते. (सन २०२१-२०२२ या काळात एकूण ४९०३०४ आस्थापनांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत पाहणी करण्यात आली. त्यापैकी १५७७२ उल्लंघन करणाऱ्या

आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून एकुण रु.१.७५ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला असून ४३.३९४ मे. टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.) दिनांक ०१ जुलै २०२२ पासुंन केंद्र शासनाने एकल वापर प्लास्टिक बंदीची अधिसूचना जारी केल्यापासून ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत करण्यात आलेली कारवाई -

१) तपासणी करण्यात आलेल्या आस्थापनां - २१८४७१,

२) उल्लंघन नोंदवले आस्थापना- १८०१६,

३) एकूण प्लास्टिक जप्त -९६.४७७ टन,

४) एकूण दंड रु.२,२१,४३,३८१/-

५) एकुण ०९ दोषी उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४८) ५१७७६ (१८-०१-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बंद असलेली जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरु करण्यात येणार असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४ जिल्हयात कॅग अहवालात जलयुक्त शिवार योजना अपयशी ठरल्याने हजारो कोटी रुपये खर्च करुन अपेक्षित पाण्याची पातळी वाढली नसल्याने याप्रकरणीची चौकशीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) भूजल पातळीतील वाढ किंवा घट हे पर्जन्यमान व त्याची तीव्रता, जलसंधारण व भूजल पुनर्भरण कामामुळे होणारे भूजल पुनर्भरण, मान्सून कालावधीमध्ये पर्जन्यमानात खंड पडल्यास, त्यावेळी पुरक सिंचनाकरिता होणारा भूजल उपसा, मान्सूनोत्तर कालावधीतील भूजल उपसा, विंधन विहिरींद्वारे अतिखोल जलधरातून होणारा भूजल उपसा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली वाढ अथवा घट या बाबींवर अवलंबून असते. त्यामुळे, भूजल पातळी वाढविण्यात हे अभियान अपयशी ठरले नसून अनेक गावात भूजल पातळी वाढ़ली आहे. तसेच उपसा वाढला तरी अनेक गावात भूजल पातळी स्थिर आहे. अभियानामुळे पिक पेरा क्षेत्रात वाढ, उत्पादनात वाढ व शेतकऱ्यांच्या राहणीमानात वाढ झालेली आहे.

तथापि, महालेखापाल यांच्या अहवालास अनुसरून शासन नियुक्त समितीच्या शिफारशीनुसार संबंधित प्रकरणांची चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई–पुणे व नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी वाहतुकीसाठी वेग नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करुन वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४९) ५१८८० (१८-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) ॲड . राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वाधिक अपघात वळणदार रस्त्यापेक्षा सरळ मार्गावर होत असल्याची धक्कादायक माहिती महामार्ग पोलिसांच्या आकडेवारीवरून समोर आली असल्याचे माहे सप्टेबर २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुंबई-पुणे महामार्ग रस्त्यावरील सरळ मार्गावरील अपघातात वाढ होत असतानाच मुंबई–पुणे, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील सरळ रस्त्यावर वाहतुकीसाठी वेग नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करुन वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सरळ रस्त्यावरील होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणत्या प्रभावी उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यात महामार्गावरील सरळ मार्गाची लांबी ही सामान्यत: वळण मार्गाच्या तुलनेत जास्त असल्याचे आढळत असून अपघातांची संख्या सरळ मार्गावर जास्त आहे.

पोलिस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून प्राप्त झालेली जानेवारी ते डिसेंबर, २०२१ या कालावधीतील अपघाताबाबतची सांख्यिकीवरुन वळणदार रस्त्यापेक्षा सरळ मार्गावर अपघाताचे प्रमाण तुलनेने जास्त आहे.

तथापि, रस्ते व द्रुतगती महामार्ग हे इंडियन रोड काँग्रेसच्या संबंधित मार्गदर्शक तत्वानुसारच संकल्पित करण्यात आलेले आहेत. विहीत मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहने चालवणे, वाहन चालविताना दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर न ठेवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेकिंग करणे, लेन शिस्त न पाळणे, सुस्थितीत वाहने नसणे, वाहन अवैधरित्या पार्क करणे, वाहतूक सुरक्षिततेविषयी काळजी न घेणे, तसेच ड्रायव्हिंग करताना ड्रायव्हर सतर्क नसणे इत्यादी द्रुतगती महामार्गावर अपघात होणेची प्रमुख कारणे आहेत.
(२) अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील दि.२५ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार राज्यातील रस्ते व महामार्गावर वेगमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

तसेच, अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गासाठी स्वतंत्रपणे वेगमर्यादा निश्चित करणेत आलेली आहे.

मुंबई- पुणे व नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग या दोन्ही द्रुतगती महामार्गावर ठिकठिकाणी वाहनांची वेगमर्यादा दर्शक फलके लावण्यात आली आहेत. तसेच, महामार्ग पोलीसांमार्फत व आरटीओमार्फत अपघात होऊ नये यांसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनचालकांना वेळोवेळी समुपदेशन केले जाते.

मुंबई-पुणे, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर महामार्ग पोलीसांमार्फत व आरटीओमार्फत Interceptor Vehicle द्वारे वाहनांचा वेग मोजून, वेग मर्यादा न पाळणाऱ्या वाहन चालकांवर दंड आकारणी करुन रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यात येतो.
(३) द्रुतगती महामार्गावरील अपघात टाळणेसाठी रस्ता सुस्थितीत ठेवणे, आवश्यक दिशादर्शक चिन्हे, सूचना फलके, माहिती फलके, वेगमर्यादा दर्शक फलके लावणे, लेन मार्किंग करणे, क्रॅटआईज व डेलिनेटर्स लावणे, सुरक्षततेविषयी वाहनचालकांचे समुपदेशन करणे, वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांवर दडांत्मक कार्यवाही करणे इ. उपाययोजना करणेत आलेल्या आहेत व करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा हा नवा उपक्रम राबविताना "राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त" हे पद रिक्त असल्याबाबत

**(५०) ५१८८७ (२४-०१-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जनतेची कामे विहित कालावधीत व्हावी या करिता राज्य सरकारने राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याला ५ नोव्हेंबर पर्यन्त एक महिन्याची मुदतवाढ दिली असून कामावर नियंत्रण ठेवण्याकरिता "राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त" हे पद मागील ८ महिन्यापासून रिक्त असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती  कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०२-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पदावर नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव – १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.